“ ज्ञानाची शेती ”

# सुधारित ज्वारी लागवड तंत्रज्ञान

**अंकुश बरडे एम एस्सी. (कृषी)**

ज्वारी हे पीक तिन्ही हंगामामध्ये घेता येते परंतु रब्बी ज्वारीचे पिक हे प्रामुख्याने धान्यासाठी व उत्कृष्ठ प्रतीच्या कडब्यासाठी महाराष्ट्रामध्ये घेतले जाते. ज्वारी खालील क्षेत्र आणि उत्पादनात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. 20-25 वर्षापूर्वी खरीप ज्वारीचे पिक फार मोठ्या प्रमाणात प. महाराष्ट्रात, मराठवाडा व विदर्भामध्ये घेतले जात होते. त्या पिकाची जागा आता सोयाबीन या पिकाने घेतली आहे.आजही मराठवाड्यात काही भागामध्ये खरीप ज्वारी (पिवळी) हे पिक काही शेतकरी धान्य व कडब्यासाठी घेतात. ज्वारी ही कमी पावसात धान्य व कडब्याचे हमखास उत्पादन देणारे पीक असून खरीप ज्वारीच्या तुलनेने रब्बी ज्वारीच्या धान्य आणि कडब्याची प्रत उत्तम असते. आहारामध्ये ज्वारी हे एक अनन्यसाधारण महत्व असलेले धान्याचे पिक असून रब्बी ज्वारीची लागवड सोलापूर, अहिल्यानगर, पुणे, बीड, धाराशिव, परभणी, जालना, लातूर व विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कमी अधिक प्रमाणात घेतले जाते. सोलापूर जिल्ह्यास तर " **ज्वारीचे कोठार** " म्हटले जाते. रब्बी ज्वारीचे पिक काढणीचे काम जास्त जिकिरीचे व श्रमाचे असल्याने तसेच शेतकऱ्यांना इतर पिकांचे हरभरा, राजमा, ऊस, फळबाग इत्यादी पिककांचे पर्याय उपलब्ध झाल्याने दिवसेंदिवस या पिकाखालील क्षेत्र कमी होत आहे. .



उत्कृष्ठ प्रकारचे पौष्टिकमुल्य व आरोग्यवर्धक ज्वारीचे धान्य आणी कडबा उत्पादनासाठी या पिकाखालील सध्याच्या क्षेत्रामधून सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादकता वाढीसाठी प्रयत्न करावे लागतील तरच या पिकाचा समृद्ध वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहचवणे शक्य होणार आहे त्यासाठी **“ ज्ञानाच्या शेतीचा ”** हा प्रयत्न.

**रब्बी ज्वारी - उत्पादनातील अडचणी :-**

- ✓ कोरडवाहू भागात, खरीप हंगामातिल पडणाऱ्या पावसाच्या साठवलेल्या ओलाव्यावर हे
- ✓ पिक घेतले जाते.
- ✓ प्रामुख्याने हलक्या / मुरमाड जमिनीत ज्वारी घेतली जाते.
- ✓ जमिनीच्या प्रकारानुसार सुधारित वाणांचा वापर होत नाही.
- ✓ बियाण्याच्या अयोग्य प्रमाण, वाजवी पेक्षा जास्त बियाणे पेरणीसाठी वापरले जाते.
- ✓ पावसाची अनिश्चितता.
- ✓ सेंद्रिय व रासायनिक खतांचा वापर कमी.
- ✓ रोग व किडींचा प्रादुर्भाव

**उच्च उत्पादन तंत्रज्ञान :-**

- ✓ पेरणीपूर्वी शेताची बांधबंदिस्ती.
- ✓ पावसाचे पाणी मुरविण्याचे तंत्र.
- ✓ जमिनीच्या प्रकारानुसार सुधारित वाणांची निवड.
- ✓ वेळेवर पेरणी.
- ✓ सुधारित वाणाचे प्रमाणित बियाणे व बीजप्रक्रिया.

- ✓ हेक्टरी झाडांची संख्या योग्य राखणे.
- ✓ एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन.
- ✓ तण नियंत्रणासाठी योग्यवेळी आंतरमशागत करणे.
- ✓ पिक वाढीच्या संवेदनशील अवस्थेत पाणी व्यवस्थापन करणे
- ✓ पिक संरक्षण.

**हवामान :-**

ज्वारी हे पिक समशितोष्ण ते उष्ण हवामानाच्या प्रदेशात घेतले जाणारे असुन ज्वारीस उष्ण व कोरडे हवामान मानवते.परंतु तापमान 10 c पेक्षा कमी 40 c पेक्षा जास्त झाल्यास पिकाच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो व दाणे भरत नाहीत.ढगाळ वातावरणामध्ये हे पिक चांगले येते. ज्या वर्षी थंडीचे प्रमाण जास्त राहते त्यावर्षी ज्वारीची उत्पादकता कमी येते.

**जमिन:-**

सन 2000 पूर्वी प.महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भामध्ये रब्बी ज्वारी लागवड करावयाचे क्षेत्र खरिपात मोकळे ठेऊन त्यास नियमितपणे कुळवाच्या पाळ्या टाकून जागेवर पावसाचे पाणी पुरवण्याचे काम केले जात असे व त्यानंतर रब्बीमध्ये त्या क्षेत्रावर ज्वारी पेरली जात असे. या प्रकारे मान्सूनच्या पाऊसाचे जागेवर मृद व जलसंधारण केले जात होते व कोरडवाहू रब्बी ज्वारी पिकाचे उत्पादन घेतले जात होते.

रब्बी ज्वारीसाठी मध्यम ते खोल काळी कसदार जमिन निवडल्यास पावसाचे पाण्यावर कोरडवाहू पीक घेणे शक्य होते.ज्वारीच्या पिकासाठी 5.5. ते 8.5 सामू असलेली जमीन निवडावी.

पाणथळ ,चोपण,क्षारपड जमिनीमध्ये ज्वारी पिकाची उगवण, वाढ चांगली होत नाही तसेच खूप हलक्या जमिनीवर लागवड केल्यास आणि पाण्याची उपलब्धता नसल्यास पिकाचे उत्पादन खूप कमी येते.हलक्या जमिनीवर लागवड करावयाची असेल तर 3-4 पाण्याच्या पाळ्या देण्याची व्यवस्था असावी.



**पूर्व मशागत :-**

या पिकाचे लागवडीसाठी तीन वर्षातून एका वेळेस नांगरट करावी. खरीप पिकाची काढणी केल्यानंतर पेरणीपुर्वी 2-3 कुळवाच्या पाळ्या देऊन जमिन भुसभुशीत करून घ्यावी. रब्बी ज्वारी पीक पावसाळ्यात पडणाऱ्या पावसाच्या ओलाव्यावर येत असते त्यासाठी जमिनीची प्रत व उतारानुसार चौरस आकाराचे वाफे किंवा बंदिस्त सरी वरंबे तयार करावेत. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. शेवटच्या पाळीपूर्वी 2 टन शेणखत जमिनीत निसळून घ्यावे.

**वाण:-**

रब्बी ज्वारी पिकाचे खालील वाण उत्पादनामध्ये उत्कृष्ट आहेत या वाणाचे प्रमाणित बियाणे शेतकर्यांनी पेरणीसाठी वापरावेत. जमिनीच्या प्रकारानुसार वाणाची निवड करणे हे उत्पादन वाढीचे मुख्य सूत्र आहे.

**हलक्या जमिनीसाठी :-** फुले अनुराधा, फुले यशोमती आणि सिलेक्शन 3.

**मध्यम ते भारी जमिनीसाठी :-** परभणी मोती,परभणी ज्योती, परभणी सुपरमोती, परभणी सुपर दगडी, अकोला क्रांती,फुले वसुधा व फुले रेवती.

**हुरड्यासाठी :** फुले वसंत, फुले मधुर, फुले उत्तरा वाण लागवडीसाठी वापरावेत.

वरीलपैकी काही महत्त्वाचे व शेतकऱ्यांमध्ये प्रचलित असणारे वाणाची माहिती खाली सविस्तर दिलेली आहे सदरच्या वाणाची बियाणे हे महाबीज या शासन अंगीकृत यंत्रणा त्यांच्या डीलरमार्फत विक्रीसाठी उपलब्ध करून देते.

**फुले सुचित्रा:-** अवर्षण प्रवण भागात मध्यम जमिनीसाठी शिफारस, भाकरीची व कडब्याची प्रत उत्तम, दाणे पांढरे शुभ्र,चमकदार व आकर्षक ईतर वाणापेक्षा सरासरी 25% अधिक उत्पादन मिळते.

**फुले अनुराधा :-** हलक्या जमिनी, जिरायत,अवर्षण भागासाठी योग्य, लवकर येणारा वाण.

**फुले रेवती :-** भारी जमीन व बागायती साठी विकसित, भाकरीची चव उत्तम,दाणे पांढरेशुभ्र मोत्यासारखे.

**फुले वसुधा :-** कोरडवाहू, बागायती लागवडीसाठी योग्य, दाणे मोत्यासारखे पांढरे शुभ्र व चमकदार, भाकरी व कडब्याची प्रत उत्तम.

**फुले मधुर :-** हुरड्यासाठी सुधारित वाण, हुरडा गोड व रुचकर, दाणे कणसातून सहज निघतात.

**परभणी मोती :-** कोरडवाहूसाठी शिफारस,टपोरा मोत्यासारखा दाणा, पाणी दिल्यास जास्त उत्पादन मिळते.

**परभणी ज्योती :-** ओलिता खाली घेण्याची शिफारस, उंच वाढणारा पण जमिनीवर न लोळणारा, दाण्याची आणि कडब्याची प्रत उत्तम.

**परभणी सुपर मोती :-** मध्यम उंच वाढणारा पण जमिनीवर न लोळणारा,दाण्याची आणि कडब्याची चव उत्तम मावा किडीस प्रतिकारक्षम, मराठवाड्यासाठी शिफारस.

**परभणी सुपर दगडी :-** भाकरीची आणी कडब्याची प्रत उत्तम,महाराष्ट्रासाठी प्रसारित, किड व रोगास मध्यम सहनशील.

**अकोला क्रांती :-** कोरडवाहू आणि बागायती लागवडीसाठी शिफारस, टपोरा आणी चमकदार दाणा, भाकरीची व कडब्याची प्रत उत्तम.

फायद्याची व आरोग्यदायी..!

**पेरणीची वेळ :-**

कोरडवाहू साठी सप्टेंबर चा दुसरा आठवडा आणी बागायतीसाठी ऑक्टोबर चा पहिला पंधरवडा या दरम्यान पेरणी करावी .15 ऑक्टोबर नंतर पेरणी केल्यास उत्पादनात घट होते. सप्टेंबरच्या पहिल्या पंधरवाड्यात पेरणी केल्यास कडब्याचे उत्पादन वाढते व धान्याचे उत्पादन घटते तसेच लवकर पेरणी केल्यास खोडमाशीचा प्रादुर्भाव वाढतो आणी पेरणीस उशीर झाल्यास बियाणांची उगवण कमी होते. कोरडवाहू ज्वारीची लागवड शक्य होईल तेवढी लवकर करावी तर बागायती ज्वारीची पेरणी करण्यास उशीर झाल्यास हरकत नाही.

**बियाणाचे प्रमाण :-**

4 किलो प्रति एकरी वापरावे. शेतकरी बऱ्याच वेळा एकरी 5-6 किलो बियाणे पेरणीसाठी वापरतात त्यामुळे कडब्याचे उत्पादन जास्त मिळते परंतु धान्याचे उत्पादन कमी होते.जास्त दाट पेरणी केल्यास कीड व रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता जास्त असते.

**बीजप्रक्रिया :-**

अॅझोटोबॅक्टर, ट्रायकोडर्मा, स्फुरद विरघळवणारे जिवाणू , पालाश उपलब्ध करून देणारे जिवाणू 5 ग्रॅम प्रत्येकी प्रति किलो बियाणास थोड्याश्या गुळाच्या पाण्यासोबत घेऊन चोळावे.प्रकिया केलेले बियाणे सावलीत सुकवून लगेच पेरणीसाठी वापरावे.

**पेरणीचे अंतर :-**

कोरडवाहूसाठी 45 X 15 सेमी,
बागायतीसाठी 45 X 10 सेमी,
5 सेमी खोलीवर बियाणे पेरावे.

एकरी रोपांची संख्या – कोरडवाहू :- 54 हजार व बागायतीसाठी :- 72 हजार

पेरणी ट्रक्टर च्या साहाय्याने करावी त्यामुळे एकच वेळी खत व बियाणे पेरणे शक्य होते. ट्रक्टरचलित बीबीएफ यंत्राद्वारे पेरणी केल्यास परतीच्या पावसाने पाणी जागेवरच मुरण्यास मदत होते त्यामुळे पीक उत्पादनात लक्षणीय वाढ होते..

**खतांची मात्रा :-**

शेणखत 2 टन प्रति एकरी शेवटच्या पाळीपूर्वी जमिनीत मिसळून द्यावे. कृषी विद्यापीठाने रासायनिक खताची शिफारस खालील प्रमाणे केलेली आहे त्यानुसार बाजारात उपलब्ध असणाऱ्या संयुक्त खतामधून पिकास खते द्यावीत.

कोरडवाहू : एकरी 16 किलो नत्र आणी 8 किलो स्फूरद या रासायनिक खताची शिफारस कृषी विद्यापीठाने केलेली आहे त्यासाठी 20:20:00 या संयुक्त खताची एक बॅग व 16 किलो युरिया पेरणीच्या वेळी यांना सोबत पेरणी द्यावा रासायनिकत बियाण्याचे खाली पडेल याची काळजी घ्यावी.

बागायती : एकरी 32 किलो नत्र, 16 किलो स्फूरद आणी 16 किलो पालाश रासायनिक खताची परस्पर विद्यापीठाने केलेली आहे त्यासाठी 10:26:26 हे संयुक्त खत 60 किलो, 20 किलो यूरिया पेरणीचे वेळी बियाच्या खाली हे पाहावे त्यानंतर एक महिन्यांनी 34 किलो युरिया कोळपणीचे पूर्वी द्यावा जेणेकरून कोळपणी मध्ये तो माती आड होईल.

**आंतरमशागत :-**

**विरळणी :-**

पेरणीनंतर 10 ते 15 दिवसानंतर करून एका जागेवर एक रोप ठेवावे.

**कोळपणी :-**

पहिले कोळपणी पेरणीनंतर 3 आठवड्याने फटीच्या कोळप्याने करावी.
दुसरी कोळपणी 5 आठवड्यांनी फासेच्या कोळप्याने करावी.
शक्य असल्यास तिसरी कोळपणी 8 आठवड्यांनी फासेच्या कोळप्याने करावी.

**तणनाशकाचा वापर :-**

उगवणपूर्व तणनाशक अट्राझीन 50 % प्रवाही 400 ग्रॅम 200 लिटर पाण्यात घेऊन फ्लॅट फॅन किंवा फ्लड जेट नोझल वापरूण पेरणीनंतर 48 तासाच्या आत फवारणी केल्यास सुरुवातीच्या एक महिन्याच्या कालावधीपर्यंत तणाची फारशी वाढ होत नाही. ज्वारी पिकामध्ये कमी खर्चात तण नियंत्रण करण्यासाठी उगवण पूर्व रासायनिक तणनाशकाची पेरणीनंतर ताबडतोब फवारणी करावी आणी तीन आठवड्यांनी व पाच आठवड्यांनी अशा दोन कोळपण्या कराव्यात त्यामुळे प्रभावीपणे तण नियंत्रण होते.

ज्ञानाची शेती फायद्याची व आरोग्यदायी..!

**पाणी व्यवस्थापन :-**

ज्वारी पिकाचे खाली नमूद पीक वाढीच्या नाजूक अवस्थेत पिकास पाणी कमी पडू देऊ नये.

- ✓ जोमदार वाडीची अवस्था ( पेरणीनंतर 28 ते 30 दिवस)
- ✓ पोटरी अवस्था( पेरणीनंतर 50 ते 55 दिवस)
- ✓ फुलोरा अवस्था ( पेरणीनंतर 70 ते 75 दिवस)
- ✓ दाणे भरणे ( पेरणीनंतर 90 ते 95 दिवस)

ज्वारी पिकास पाणी देण्यासाठी पिकवाढीच्या सुरुवातीच्या काळात तुषार सिंचन करणे शक्य होते तसेच पिकवाढीच्या अवस्थामध्ये पाण्याचा संरक्षित पाणी देऊन कार्यक्षम वापर शक्य होतो. पाणी 5 सेमी खोली पर्यंत द्यावे. जास्त प्रमाणात पाणी दिल्यामुळे मावा या किडीचा प्रादुर्भाव वाढतो व त्यामुळे त्यावर चिकटा पडतो आणि कडब्याची प्रत खालावते तसेच उत्पादनामध्ये घट येते.



**एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन :-**

ज्वारी या पिकावर खोडमाशी, खोडकिडा, अमेरिकन लष्करी अळी,मावा इत्यादी किडींचा प्रादुर्भाव होतो तसेच तांबेरा, करपा या रोगांचा प्रादुर्भाव आढळून येतो. आपल्याकडे ज्वारी या पिकावर किड व रोग नियंत्रणासाठी उपाय योजना केल्या जात नाहीत परंतु अलीकडच्या काळामध्ये लष्करी अळीचा प्रादुर्भाव जास्त होत असल्यामुळे शेतकरी या अळीच्या नियंत्रणासाठी उपाययोजना करत आहेत. कीड व रोगाचे कमी खर्चात व्यवस्थापन करण्यासाठी तसेच उत्पादनामध्ये भरघोस वाढ होण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे एकात्मिक कीड व रोग तसेच पीक व्यवस्थापनाचे खालील उपाय योजावेत.

- ✓ पिकाची फेरपालट करावी.
- ✓ जमिनीचा प्रकारानुसार वाणाची निवड करावी.
- ✓ बियाण्याची प्रमाण योग्य राखावे, दाट पेरणी करू नये.
- ✓ बीबीएफ यंत्राद्वारे पेरणी करावी.
- ✓ जैविक कीडनाशके तथा जैविक खताची बीजप्रक्रिया करावी.
- ✓ एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे.
- ✓ उगवणपूर्व तणनाशकाची फवारणी व दोन कोळपण्या करून पीक तणमुक्त ठेवावे.
- ✓ पिकाच्या संवेदनक्षम अवस्थेमध्ये पाणी व्यवस्थापन करावे.
- ✓ अमेरिकन लष्करी अळीसाठी फेरोमन सापळे व माव्यासाठी चिकट सापळे लावावेत.
- ✓ पाच टक्के लिंबोळी अर्काची फवारणी करावी.

ज्वारीवर येणाऱ्या किड व रोगांचे रासायनिक पद्धतीने नियंत्रण करण्यासाठी खाली नमूद केलेप्रमाणे कीड व रोगनिहाय शिफारशीत किडनाशकांचा वापर करावा.

**खोडमाशी:-** क्विनॉलफॉस 35 % प्रवाही 14 मिली किंवा सायपरमेथ्रीन 10%, 20 मिली किंवा क्लोरोपायरीफॉस 20%, 25 मिली 10 लिटर पाण्यामध्ये घेऊन फवारावे.

**खोडकिडा :-** क्विनॉलफॉस 35 % प्रवाही 750 मिली 500 लिटर पाणी.

पेरणीपूर्वी बियाणास थायोमिथोक्झान 30% FS 10 मिली किंवा इमिडाक्लोप्रिड 48 % FS 10 मिली बियाणास चोळावे.

**अमेरिकन लष्करी अळी :-** ही एक अत्यंत घातक कीड असून हिचा प्रादुर्भाव सुरुवातीच्या टप्प्यात मोठ्या प्रमाणात सध्या आढळून येत आहे त्यामुळे तिचे वेळीच नियंत्रण करणे आवश्यक असते. फेरोमन सापळे लावून अळीचा प्रादुर्भाव वेळीच ओळखावा व नियंत्रणासाठी 5% लिंबोळी अर्काची प्रतिबंधात्मक म्हणून फवारणी घ्यावी. रासायनिक कीडनाशकामध्ये थायामेथोक्सम 12.6 % + लैम्बडा सायहॅलोथ्रीन 9.5% झेडसी 2.5 मिली किंवा क्लोरॅनट्रिनिलीप्रोल 18.5% एस सी 4 मिली किंवा स्पायनोटोरम 11. 7 % 5 मिली प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणीचे औषध ज्वारीच्या पोंग्यात जाईल याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

**मावा (चिकटा) :-** डायमिथोएट 30 % ईसी 200 मिली किंवा मिथिल पॅरॉथिऑन 25 % EC,175 मिली किंवा इंडोसल्फान 35 ईसी 280 मिली - 200 लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**करपा :-** रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड 2.5 प्रति लिटर ग्रॅम पाण्यात घेऊन फवारावे.

**हुरडा ज्वारी लागवडीसाठी काही महत्त्वाचे मुद्दे**

सध्याच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे शहरी लोकांसाठी ग्रामीण पर्यटन एक आवडीचा विषय झालेला आहे. शहरातील मंडळी सुट्टीच्या दिवशी शेतात फेरफटका मारणे तसेच शेतातील रानमेव्याचा आस्वाद घेण्यास आवर्जून कृषी पर्यटन केंद्रास भेट देत आहेत व तरुणांची शेती, माती, पिक इत्यादी बाबत उत्सुकता वाढत असल्यामुळे ही मंडळी शहराचे जवळपास सुट्टीच्या दिवशी पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहेत. त्यामुळे " हुरडा पार्टी " थंडीच्या दिवसातील आकर्षक पर्यटन होत चालले आहे.

त्यासाठी शेतकऱ्यांनी हूरडा लागवड करत असताना पुढील प्रमाणे नियोजन करावे. हुरड्याची लागवड 10-15 दिवसाच्या अंतराने एक ऑक्टोबर पासून डिसेंबर पर्यंत करावी जेणेकरून तीन-चार महिन्याच्या कालावधीसाठी हुरडा उपलब्ध होऊन हुरडा पार्टीचे आयोजन करणे शक्य होईल. हुरड्यासाठी ज्वारीचे दाणे दुग्धअवस्थेत असताना कणसाची काढणी करणे गरजेचे असते. पिक 85 - 85 दिवसाचे असताना म्हणजेच पीक फुलोऱ्यानंतर 15-20 दिवसांनी हुरड्यासाठी कणसाची काढणी करावी या अवस्थेमध्ये दाणे मउ असून त्यामध्ये गोडवा जास्त असतो. कणसाची काढली केल्यानंतर हिरव्या चाऱ्याचा वापर स्वतः च्या पशुधनासाठी वापर करावा किंवा चारा विक्री करावी तसेंचव्ह या पासून मुरघास तयार करून त्याची विक्री केल्यास त्यापासून चांगला आर्थिक फायदा होतो.

ज्या शेतकऱ्यांची शेती रस्त्या लगत आहे त्यांनी या प्रकारचा तीन-चार महिन्यासाठीचा पर्यटन व्यवसाय करणे काहीच हरकत नाही. यासाठी सावलीखाली निट- नेटकी स्वच्छ बसावयास जागा, काही खुर्च्या- टेबल एखाद दुसरे प्रसाधन ग्रह इत्यादी किरकोळ सुविधा तयार करून स्वच्छता राखल्यास आणी ग्राहकास उच्च प्रतीची सेवा दिल्यास चांगल्यापैकी पर्यटक प्रतिसाद देतात. हुरड्यासोबत इतर शेती उत्पादने जसे की बोर, ऊस,हरभऱ्याचे डहाळे, इत्यादी विक्रीसाठी ठेवल्यास पर्यटकांना त्याचा लाभ घेता येईल. तसेच याठिकाणी वर्षभर पिकवलेले धान्य, डाळी, गूळ,मध इत्यादी विक्रीसाठी ठेऊ शकता त्यातुन शेतकऱ्यांना वर्षभर रोजगार उपलब्ध तर होईलच त्यासोबत उत्पादक ते ग्राहक विक्री केल्यामुळे त्यातून चांगले आर्थिक उत्पन्न मिळू शकते .

**काढणी, मळणी व उत्पादनः-**

जातीपरत्वे 110 ते 130 दिवसात पीक काढणीस तयार होते. पिक पक्व झाल्यावर कणसातील दाणे टणक होतात, दाताखाली दाबल्यास कट असा आवाज येतो व पिठाळ लागते अशा वेळेस पीक काढणीस तयार झाले असे समजावे. शक्यतो ज्वारीची काढणी ही मुळासकट ताटे उपटून करावे त्यानंतर अशी ताटे 3-4 दिवस उन्हात वाळू द्यावित.त्यानंतर ठराविक ताटाच्या योग्य आकाराच्या पेंड्या बांधाव्यात. नंतर कणसे विळ्यानी कापूण ती एका जागेवर गोळा करून त्यांची मळणी करावी व धान्य उफनणी करून उन्हात दोन दिवस वाळवून पोत्यात भरुन ठेवावे.

जमिनीची प्रत, पेरणीला वाण, पाणी व्यवस्थापन व शेतकऱ्यांनी केलेले एकंदरच पीक व्यवस्थापन यावर पिकाचे उत्पादन अवलंबून असते. ज्वारीचे एकरी कोरडवाहू मध्ये 6 ते 8 क्विंटल तर बागायतीमध्ये 12 ते 14 क्विंटल उत्पादन मिळते व कडब्याचे उत्पादन धान्याच्या 2.5 ते 3 पट मिळते. काही प्रगतशील शेतकरी सुधारित वाणाचा वापर व सुधारित पीक व्यवस्थापन तंत्राच्या साह्याने पिकाचे व्यवस्थापन उत्कृष्ट रित्या करुन 20 ते 25 क्विंटल धान्याचे उत्पादन घेत आहेत.



फायद्याची व आरोग्यदायी..!